**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)**

मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर पिन.४२३१०९

फोन नं. (०२४२३) २५८५००/२५८७७१/२५८७७२ फॅक्स नं.२५८८७०

(Website www.sai.org.in , E-mail – purchase@sai.org.in)

## जाहीर ई-निविदा

श्री साईबाबा संस्थानचे लाडू निर्मिती व मंदिर विभागांसाठी गाईचे शुध्द तूप खरेदीकामी प्रक्रिया करणारे/उत्पादकांकडून स्वतंत्रपणे ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ.नं. | निविदा कालावधी | निविदा फी | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | जानेवारी ते मार्च २०१९ | रु.३०,०००/- | ३,००,०००/- |
| ०२ | एप्रिल ते जून २०१९ | रु.३०,०००/- | ३,००,०००/- |
| ०३ | जुलै ते सप्टेंबर २०१९ | रु.३०,०००/- | ३,००,०००/- |
| ०४ | ऑक्टोबर ते डिसेंबर २०१९ | रु.३०,०००/- | ३,००,०००/- |

१. ई-निविदा व ई-निविदेबाबतच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

२. निविदा ऑनलाईन डाऊन लोडींग व अपलोडींगसाठी दि. १२/११/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दि. ०५/१२/२०१८ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहतील.

३. **निविदा फी व बयाणा रक्कम शासनाच्या** www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

४. दि.०६/१२/२०१८ ते दि. ०८/१२/२०१८ या कालावधीत सायं.०५.०० . वाजेपर्यंत (रविवार खेरीज) निविदेमध्ये दर भरलेल्या तूपाचा नमुना शिर्डी कार्यालयात सादर करावा.

५. शक्य झाल्यास तांत्रिक निविदा दि.१०/१२/२०१८ रोजी उघडण्यात येतील.

कोणतीही निविदा अंशत:/पुर्णपणे स्वीकारणे अथवा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे.

**(श्रीमती.रुबल अग्रवाल, भा.प्र.से)**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

# SHRI SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI

At/post-Shirdi, Tal-Rahata, Dist- Ahmednagar- 423109
Phone No.(02423) 258500/771/772, Fax No.02423-258870
(Website www.sai.org.in , E-mail – purchase@sai.org.in)

---

## E-TENDER NOTICE

E-tenders are invited from Manufacturers/Processors for the supply of Cow Ghee Pure for our Ladu Nirmiti & Temple Department as per details given below-

| Sr.NO. | Tender period | Tender Fee | E.M.D. |
|---|---|---|---|
| 1 | January to March 2019 | Rs.30,000/- | Rs.3,00,000/- |
| 2 | April to June 2019 | Rs.30,000/- | Rs.3,00,000/- |
| 3 | July to September 2019 | Rs.30,000/- | Rs.3,00,000/- |
| 4 | October to December 2019 | Rs.30,000/- | Rs.3,00,000/- |

1. E-Tender & its terms and conditions are available on www.mahatenders.gov.in.
2. The E-Tender is available for Downloading & Uploading from 12/11/2018 11.00 AM to 05/12/2018 up to 5 PM.
3. **Tender Fee & EMD should be paid Online on the website** www.mahatenders.gov.in
4. The sample of Cow Ghee Pure is to be submitted from 06/12/2018 10 AM to 08/12/2018 up to 5.00 PM at our Shirdi office on all working days except Sunday.
5. If possible Technical Bids will be opened on 10/12/2018.

Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi reserves the right to accept partly/fully any tender or reject all tenders without assigning any reason thereof.

**(Smt.Rubal Agarwal, I.A.S.)**
**CHIEF EXECUTIVE OFFICER**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)**
**शिरडी ४२३ १०९.**
**तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगर**

दुरध्वनी क्रमांक (९५-२४२३) २५८५००, खरेदी विभाग- २५८७७१, २५८७७२,
फॅक्स क्रमांक +९१-०२४२३-२५८८७०
Website – www.sai.org.in E-mail 1.saibaba@sai.org.in 2.purchase@sai.org.in

**मुंबई कार्यालय -** साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, दादर
मुंबई-४०० ०१४ दुरध्वनी क्रमांक (०२२) २४१६६५५६, २४१६१२९३

# श्री साईबाबा संस्थानचे लाडू निर्मिती व मंदिर विभागांसाठी गाईचे शुध्द तूप खरेदीबाबत ई-निविदा

**१ एप्रिल -२०१९ ते ३० जुन-२०१९ – तीन महिने**

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

## <u>निविदाधारकांसाठी सूचना</u>

१. ई-निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे, आर्थिक उलाढालीचे निकष व इतर शर्ती/अटींचा तपशील सोबत दिलेला आहे.

२. निविदाधारकाने निविदेसोबत ई-निविदा फी रक्कम रू.३०,०००/- व बयाणा रक्कम रू.३,००,०००/- <u>www.mahatenders.gov.in</u> या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

३. पूर्ण माहिती भरलेली निविदा मुदतीत ऑनलाईन सादर करावयाची जबाबदारी निविदाधारकांची राहील.

४. सदर निविदा दि.१२/११/२०१८ रोजी सकाळी ११.०० वा.पासून दि. ५/१२/२०१८ सायं. ०५.०० वा.पर्यंत <u>www.mahatenders.gov.in</u> या संकेतस्थळावर <u>Downloading</u> व Uploading साठी उपलब्ध राहील.

५. ई-निविदा भरलेल्या गाईचे शुद्ध तूपाचे नमुने दि. ०५/१२/२०१८ अखेर सायं.०५.०० वाजेपर्यंत संस्थानचे शिर्डी येथील खरेदी विभागाचे कार्यालयात जमा करावेत.

**६. ई-निविदेसोबत फक्त Online सर्व कागदपत्रे सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये कागदपत्रे सादर करु नयेत. Hard Copy मध्ये सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.**

**७.** साधारणपणे दि१० /१२/२०१८ रोजी Online Technical Bid उघडण्यात येईल. निविदेसोबत Online सादर केलेली सर्व कागदपत्रे मागणीप्रमाणे असल्यासच Commercial Bid उघडणेत येईल अन्यथा <u>निविदा विचारात घेतली जाणार नाही.</u>

८. Commercial Bid उघडणेचे दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधींना उपस्थित राहणेबाबत दुरध्वनीद्वारे कळविण्यात येईल. ऑनलाईन निविदा सादर करताना निविदाधारकांनी आपले दुरध्वनी/मोबाईल नंबर ऑनलाईन निविदेमध्ये नमूद करावेत, म्हणजे पात्र ठरणा-या निविदाधारकांना Commercial Bid उघडणेची तारीख व वेळ कळविता येईल.

९. कोणतीही अथवा सर्व निविदा स्विकारणे किंवा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे.

**(श्रीमती.रुबल अग्रवाल, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)
## शिर्डी– ४२३ १०९.
### तालुका- राहाता, जिल्हा-अहमदनगर

**निविदेच्या शर्ती व अटी**

१. पुरवठा करावयाचे गाईचे शुध्द तूपाचा तपशिल सोबतचे परिशिष्टात (BOQ मध्ये) दिलेला आहे. त्यानुसार निविदा ऑनलाईन भरावयाची आहे.

२. गाईचे तूपाचा पुरवठा करताना ते FSSAI/AGMARK NORMS चे दर्जा प्रमाणे असणे आवश्यक राहिल.

३. निविदेसोबत निविदा फी रक्कम रु.३०,०००/- व बयाणा रक्कम रु.३,००,०००/- www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

४. गाईचे शुध्द तुप उत्पादक परवाना, GST Number Certificate किंवा ऑनलाईन GST Number Registration Receipt, FSSAI परवाना/ॲगमार्क परवाना, पॅन कार्ड, कोणत्याही शासकीय/निमशासकीय संस्था/महामंडळ/देवस्थानकडून काळ्या यादीत समाविष्ट न केलेबाबतचे स्व-स्वाक्षरीतील फर्मचे लेटरहेडवरील हमीपत्र व आपले फर्मची सन २०१५-१६,२०१६-१७ व २०१७-१८ या ३ आर्थिक वर्षाची सरासरी ऑडीट रिपोर्टमधील आर्थिक वार्षिक उलाढालीचे C.A. यांचे Certified प्रमाणपत्र वगैरे सर्व कागदपत्रे स्कॅन करुन ऑनलाईन निविदेसोबत जोडावीत.

५. ई-निविदा पुरवठा कालावधी १ एप्रिल १९ ते ३० जुन २०१९ असा राहील.

६. ई-निविदेमध्ये गाईचे तुपाचे **प्रती क्विंटलचे GST व सर्व करांसह शिर्डी संस्थान भांडार विभाग पोहोच सर्व समावेशक** Online **दर द्यावेत.** इतर टॅक्स, जकात, वाहतूक खर्च, हमाली, वाहन हॉल्टींग चार्जेस वगैरेची जादा रक्कम वेगळी लावता येणार नाही. **माल उतरविण्याची वाराई पुरवठाधारकास द्यावी लागेल.**

७. कोणतीही निविदा अंशत:/ पूर्णपणे मंजूर अथवा सर्व निविदा नामंजूर करण्याचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे. त्याबाबतची कारणे देणे संस्थानवर बंधनकारक असणार नाही.

८. निविदा कागदपत्रांसमवेत C.A. Certificate व हमीपत्र नमुना प्रत सोबत पान नं.९ व १० वर नमुद आहे. सदर प्रमाणपत्र या नमुन्यात ऑनलाईन सादर करावेत.

९. शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे ज्यांच्या निविदा मंजूर होतील त्यांना निविदा मंजुर झाल्याचे कळविलेनंतर विहीत मुदतीत गाईचे शुद्ध तूपाचा पुरवठा करावयाची हमी म्हणून पुरवठा आदेश रकमेच्या ३% इतकी रक्कम डी.डी.व्दारे/रोखीने/RTGS व्दारे सुरक्षा अनामत म्हणून भरावी लागेल. ही सुरक्षा अनामत रक्कम व्यवस्थितरित्या गाईचे शुद्ध तुपाचा पुरवठा पुर्ण केलेनंतर परत केली जाईल. सुरक्षा अनामत अगर बयाणा रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही. तसेच निविदा मंजुर झालेनंतर शिर्डी येथे समक्ष येऊन रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर त्वरित करारनामा नोटरी करुन देणे बंधनकारक राहील. **करारनाम्याची नोटरी फी निविदाधारकास आदा करावी लागेल.**

**१०. ऑनलाईन निविदा भरल्यानंतर किमान १ किलो गाईचे तूप पाऊच/डबा अथवा ५०० ग्रॅम चे दोन पाऊच/डबे नमुना म्हणून संस्थानला सादर करावे लागतील. नमुने नसलेली निविदा विचारात घेतली जाणार नाही.**

११. गाईचे तूप पुरवठा करतेवेळी जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा/ केंद्र शासन/ राज्य शासनाची किंवा NABL मान्यता प्राप्त प्रयोगशाळेचा पुरविलेले बॅचचा अहवाल बीलासोबत सादर करावा लागेल.

१२. पुरवठा केलेले गाईचे शुद्ध तुप स्विकारलेनंतर त्याचे अभिप्रायानुसार साधारण १ महिन्याचे आत बील आदा करणेचा प्रयत्न केला जाईल. सदर गाईचे शुद्ध तुपाचे पुरवठयापोटी कुठलीही आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

१३. प्रत्येक महिन्यात/दोन महिन्यात अगर कमी जास्त मुदतीत आवश्यकतेनुसार तूपाची मागणी केली जाईल. एकदम सर्व तुप घेतले जाणार नाही. संस्थानचे खरेदी चलनाप्रमाणे वेळोवेळी तुप पुरवावे लागेल. तसेच मागणीपेक्षा जादा आलेले तुप स्विकारले जाणार नाही.

...२...

क्र. ३०८

१४. मंजुर निविदेनुसार मान्य झालेल्या ब्रॅन्डचे, दर्जाचे गाईचे शुद्ध तूप पुरवावे लागेल. अन्य ब्रॅण्ड, दर्जाचे गाईचे शुद्ध तूप स्विकारले जाणार नाही. असे तुप पुरवठा झाल्यास ते स्वखर्चाने तात्काळ परत घेऊन जाणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. त्याप्रमाणे ते न नेल्यास त्याची नासधूस झाल्यास त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही.

१५. निविदा कालावधीत पुरवठा आदेशात नमुद केलेले गाईचे शुद्ध तुपाचा पुरवठा पुर्ण झाला तर सदर आदेशातील नमुद केलेल्या शुद्ध तुपाचे परिमाणापेक्षा २५ टक्के जादा तुप मंजुर दरानेच पुरविणे निविदाधारकांस बंधनकारक राहिल.

१६. निविदा पुरवठा कालावधीत पुरवठा आदेशाइतक्या तुपाचा पुरवठा पुर्ण झाला नाही तर उर्वरीत तुपाचा पुरवठा व पुरवठा आदेशाच्या २५ टक्के तुपाचा पुरवठा निविदा करारनामा कालावधीत अगर पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत (यापैकी जे अगोदर घडेल त्या तारखेपर्यंत) मान्य दराने तुपाचा पुरवठा पुरवठाधारकास करावा लागेल.

१७. शिर्डी येथे येणारे साईभक्तांचे गर्दीवर प्रसाद सेवा अवलंबुन असलेमुळे पुरवठा आदेशामध्ये नमुद केलेले सर्व तुप घेणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही. आवश्यकतेनुसार तुपाची खरेदी केली जाईल.

१८. वेळोवेळी दिलेल्या पुरवठा चलनातील तुपाचे मागणीप्रमाणे पुरवठा करुन त्याप्रमाणेच बिल सादर करणे आवश्यक आहे.

१९. संस्थानने शासकीय/शासन मान्यता प्राप्त प्रयोगशाळेकडून तपासणी केलेल्या अहवालात तुप निकृष्ट दर्जाचे असल्याचे आढळल्यास तात्काळ कोणतेही कारण न देता पुढील पुरवठा आदेश रद्द करण्यात येईल.

२०. तुपाचा पुरवठा नवीन १५ कि.ग्रॅ. चे पॅकबंद डब्यामध्येच करावा लागेल. डब्यावर मंजूर ब्रॅण्डचे नांव, शासनाचा अॅगमार्क/FSSAI Lic. No. तसेच तुपाचे उत्पादन व वैधता (Manufacturing & Expiry Date) तारीख इ. तपशिल असणे आवश्यक आहे. तूप ताजे (Fresh) असणे आवश्यक आहे. Expiry Date जवळ आलेले तूप स्विकारले जाणार नाही.

२१. संस्था/फर्म/उत्पादक यांची संस्थानला गाईचे शुध्द तूपाचा नियमित पुरवठा करण्यासाठी प्रतिदिन २५ क्विंटल किंवा त्यापेक्षा जास्त उत्पादनक्षमता असली पाहिजे. त्यापेक्षा कमी उत्पादनक्षमता असल्यास निविदाधारकास अपात्र ठरविण्यात येईल.

**२२. गाईचे तूप पुरविणेकामी निविदाधारकाची आर्थिक वर्ष सन २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ या ३ वर्षाची सरासरी वार्षीक उलाढाल किमान रु. ४,००,००,०००/- (रुपये चार कोटी) मात्र असणे आवश्यक आहे. याकामी चार्टर्ड अकाऊंटंट यांचे प्रमाणपत्र सोबत दिलेल्या नमुन्यामध्ये ऑनलाईन सादर करणे आवश्यक आहे.**

२३. निविदेत सहभागी निविदाधारकाने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर निविदेतून माघार घेतल्यास बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

२४. पुरवठा केलेल्या गाईचे शुद्ध तुपापासून बुंदी तळतांना धूर झाल्यास अगर बुंदीची कडवट चव आल्यास, बुंदी तळतांना तुपात फेस आल्यास किंवा काही खराब तुप आढळल्यास सदर तुप स्वखर्चाने त्वरीत बदलुन देण्याची जबाबदारी पुरवठाधारकावर राहील, त्याबाबत कोणतीही लेखी/तोंडी तक्रार करता येणार नाही.

२५. तुपामध्ये भेसळ अथवा ते कमी प्रतीचे आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी सबंधीत पुरवठाधारकाची व उत्पादक कंपनीची राहील. अशा पुरवठा केलेल्या तूपाची कोणतीही रक्कम संस्थान देणार नाही.

२६. तुप पुरविताना तुप ज्या बॅचचे असेल त्याचा विश्लेषण अहवाल (Analysis Certificate) N.A.B.L./Govt.Lab चा असणे आवश्यक आहे.

२७. तुपाच्या डब्यावरचे लेबल अन्न सुरक्षा (पॅकेजिंग व लेबलींग) नियम २०११ व वैधमापनशास्त्र (पॅकेजिंग व लेबलींग) च्या तरतुदीप्रमाणे असणे कायद्याने बंधनकारक आहे.

२८. संस्थानकडून अगर संस्थान नियुक्त Agency/Team कडून गरजेनुसार पुरवठादाराचे Vendor Audit केले जाईल.



3210

२९. तुपाचा पुरवठा करतांना बिलांवर खालील बाबी नमुद करणे आवश्यक आहे.

i) उत्पादकाचा FSSA LiC No.
ii) तूपाचा Brand & Quantity
iii) Lot No./Batch No.
iv) पुरवठादाराचा GST क्रमांक
v) संस्थानचा GST क्रमांक

३०. सदरील व्यवहाराबाबत वाद झाल्यास तो राहाता/कोपरगाव कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

३१. सदर ई-निविदेचा वैधता कालावधी तांत्रिक निविदा उघडल्यानंतर 120 दिवसांचा राहिल.

३२. राज्याबाहेरील निविदाकाराची निविदा मंजुर झाल्यास शासनाचे सुधारित खरेदी नियमावलीतील नियम क्र.३.१.२.८ नुसार राज्याबाहेरील पुरवठादार जर न्युनतम असला व महाराष्ट्र राज्यातील पुरवठादार व्दितीय न्युनतम असला तर महाराष्ट्र राज्यातील पुरवठादारांना प्रोत्साहन देण्यासाठी, महाराष्ट्र राज्यातील व्दितीय न्युनतम दरधारक जर न्युनतम दरधारकांच्या दरात तुप पुरविण्यास तयार असेल तर एकूण खरेदी करावयाच्या मालाच्या ५० टक्के मालाचा पुरवठा आदेश राज्यातील पुरवठादाराला देण्यात येईल व ते जर तयार नसतील तर पुर्ण मालाचा पुरवठा आदेश राज्याबाहेरील पुरवठादाराला देण्यात येईल.

३३. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट/अटी संस्थानवर बंधनकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत

## आपत्ती, नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाईबाबतच्या तरतूदी

३४. तुपाचा पुरवठा नमुन्याप्रमाणे नसल्यास, खराब आढळून आल्यास अगर ठरवून दिलेल्या मुदतीत न झाल्यास अगर Lab Report FSSAI Standards प्रमाणे न आलेस संस्थानची अडचण होऊ नये म्हणून व्दितीय, तृतीय न्युनतम दरधारकांकडून अथवा बाजारभावाने आवश्यक गाईचे शुध्द तुप खरेदी करण्यात येऊन त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची रक्कम आपले बिलातून अथवा सुरक्षा अनामत रकमेतून अगर संस्थानकडून आपणास देय असलेल्या कोणत्याही रकमेतून वसुल करणेत येईल.

३५. निविदेतील मंजुर दराने व मंजुर ब्रॅण्डचा तूपाचा पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजुर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ मागता येणार नाही अथवा अशा प्रकारची भाववाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने तूप पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा पुरवठा न केल्यास संस्थानला बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन तूप खरेदी करावे लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाकडून वसुल केली जाईल.

३६. निविदा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी निविदाधारकांच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा.युद्ध, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक मालाचा पुरवठा करु शकला नाही व तसे निविदाधारकाने त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल.



क्र 30/10

३७. पुरवठा आदेशातील तुप पुरवठा चलनाप्रमाणे मुदतीत पुरविले नाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

| | |
|---|---|
| अ) पुरवठा करावयाच्या तूपाची किंमत रु.२.०० लाखापेक्षा कमी असल्यास | विलंबाने पुरवठा केलेल्या तूपाच्या किंमतीवर प्रती आठवडा ०.५ % दराने जास्तीत जास्त १० % पर्यंत |
| ब) पुरवठा करावयाच्या तूपाची किंमत रु.२.०० लाख किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास | विलंबाने पुरवठा केलेल्या तूपाच्या किंमतीवर प्रती आठवडा ०.५ % दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत |

३८. पुरविलेल्या तूपाचे लॅब रिपोर्ट FSSAI/Agmark Standard प्रमाणे न आलेस तूप पुरवठादारास स्वखर्चाने बदलून द्यावे लागेल व सदर पुरवठा केलेल्या तूपाचे एकुण किंमतीचे २ टक्के ते ५ टक्के दंड आकारण्यात येईल.

**(श्रीमती.रुबल अग्रवाल, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

# निविदाधारकाबाबत माहिती

१. फर्मचे नांव- ------------------------------------------------

२. पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता- ------------------------------------------------

३. दूरध्वनी क्रमांक- ------------------------------------------------

ऑफीस- ------------------------------------------------

दुकान- ------------------------------------------------

निवास- ------------------------------------------------

मोबाईल नंबर- ------------------------------------------------

फॅक्स नंबर- ------------------------------------------------

ई –मेल ------------------------------------------------

४. संपर्कासाठी व्यक्तीचे नांव- ------------------------------------------------

दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक- ------------------------------------------------

५. मालकाचे/भागीदारांची नावे १. ------------------------------------------------

२. ------------------------------------------------

६. बॅंक खाते नांव १.------------------------------------------------

शाखा २. ------------------------------------------------

खाते नंबर व प्रकार ३.------------------------------------------------

आयएफएससी कोड ४.------------------------------------------------

दिनांक :- / /२०१८

ठिकाण :-

निविदाधारकाची सही व शिक्का



८
३०/१०

अ) **Technical Bid मधील कागदपत्रे**

१. उत्पादक संस्थेचा दाखला/तत्सम शासकीय परवाना/
स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला
(उदा.ग्रामपंचायत, नगर पंचायत, नगर पालिका)

२. GST Number Certificate किंवा
ऑनलाईन GST Number Registration Receipt

३. पॅन कार्ड

४. ॲगमार्क/FSSAI परवाना

५. उत्पादन क्षमता दर्शविणारे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र किंवा
ज्यात उत्पादनक्षमता नमूद केली आहे असे कोणतेही वैध प्रमाणपत्र

६. चार्टर्ड अकाऊंटंट यांचे ३ वर्षाचे सरासरी आर्थिक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र
(सोबतचे नमुन्याप्रमाणे) (सन २०१५-१६,२०१६-१७ व २०१७-१८)

७. कोणत्याही शासकीय/निमशासकीय संस्था/महामंडळ/देवस्थानकडून
काळ्या यादीत समाविष्ट न केलेबाबतचे स्व-स्वाक्षरीतील
फर्मचे लेटरहेडवरील हमीपत्र (सोबतचे नमुन्याप्रमाणे)

ब) **तूपाचा नमुना सिलबंद डबा/ पाऊच**

निविदाधारकाची सही व शिक्का



3d10

प्रति,
**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)
शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहमदनगर.

**विषय– प्रसादालय, लाडू निर्मिती व मंदिर विभागांसाठी ०१ एप्रिल ते ३० जून २०१९ करीता गाईचे शुध्द तुप पुरविणेबाबत...**

महोदय,

खालील सही करणार मी/आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिद्ध केलेली निविदा वाचली. आपल्या निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून त्या मला /आम्हाला मान्य आहेत. आपले अटी/शर्तींचे पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी/आम्ही आपणांस निविदेमध्ये नमुद केलेल्या गाईचे शुद्ध तुपाचा, आपल्या मागणीप्रमाणे उपरोक्त कालावधीकरिता, संस्थानचे आवश्यकतेनुसार, आवश्यक त्यावेळी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांचे भांडार पोहोच करण्याची हमी देतो. सदर मालाचे परिमाण अंदाजे असल्यामुळे वेळ प्रसंगी नमुद केलेल्या परिमाणापेक्षा २५% पर्यंत जास्त तुपाची संस्थानतर्फे मागणी झाल्यास मी/आम्ही तो मंजुर दराने पुरविण्याची हमी देत आहे/आहोत. नियमाप्रमाणे बयाणा रक्कम ऑनलाईन भरलेली आहे.

माझी/आमची निविदा मंजूर झाल्यास मंजूर दराने गाईचे शुद्ध तुपाचा पुरवठा करण्याची हमी म्हणून मंजुर तुपाच्या एकुण रक्कमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून निविदा मंजुर झाल्याचे कळविल्यानंतर त्वरित मी/आम्ही रोख/RTGS/NEFT द्वारे भरणा करु. याकामी भरलेली बयाणा रक्कम सुरक्षा अनामत खाती वर्ग करणेस मी/आम्ही संमती देत आहोत. तसेच रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटराईज्ड करुन देऊ व मंजूर दराने निविदा कालावधीत नमुन्याप्रमाणे ब्रॅन्डचे
गाईचे शुद्ध तुप मागणीप्रमाणे वेळेवर शिर्डी येथील मध्यवर्ती भांडार विभागात पोहोच करणे माझेवर/आमचेवर बंधनकारक राहील.

दिनांक :- / /२०१८
ठिकाण :-

आपला/आपले विश्वासू.

फर्मचे मालकाचे/भागीदाराचे नांव — सही/सहया व शिक्का
(१) -
(२) -
सोबत- कागदपत्रे



क्र ३०/१०

## वार्षीक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र

दाखला देण्यात येतो की, मे. ------------------------------------------------ यांचे निविदेसंबंधित व्यवसायाची सन २०१५-१६,२०१६-१७ व २०१७-१८ या आर्थिक वर्षाची उलाढाल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं | वर्ष | वार्षिक उलाढाल |
|---|---|---|
| १ | सन २०१५-१६ | |
| २ | सन २०१६-१७ | |
| ३ | सन २०१७-१८ | |
| | सरासरी वार्षिक उलाढाल | |

दिनांक :- / /२०१८

ठिकाण :-

लेखापरीक्षकाची सही/चार्टर्ड अकाऊंटंट

( नाव/ सही शिक्का)

नोंदणी क्रमांक.



8
30/10

FIRM LETTER HEAD

*************************************************************

## UNDERTAKING

--------------------------------------------------------------------------------

This is to certify that we M/s. ........................................................................ ........................................................................ are not blacklisted from any Government/Semi Government Institutions/Trust/Corporation for the supply of Pure Cow Ghee in last five years.

Sign. & Stamp Of Tenderer

Place :

Date : / /2018.

Requirement of Cow Ghee Pure for the Period of 01 April-2019 to 30 June-2019

| Sr.No. | Description | Quantity | Unit | Rate Per Quintal | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Cow Ghee - Pure 15Kg. New Tin Packing, Agmark/FSSAI | 2,150.00 | Quintal | | |

(Smt.Rubal Agarwal, I.A.S.)
**Chief Executive Officer**
Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi